महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान, नाशिक मंडळ,
नाशिक.

सार्वजनिक आरोग्य विभाग

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

☎ दुरध्वनी क्रमांक
कार्यालय :
कार्यकारी अभियंता : ०२५३ - २५९७९५६

कार्यालय
उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.
विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय परिसर, शालीमार,
नाशिक ४२२ ००१.

३००-४०४

प.क्र.उपसंआसे/काअ/एनएचएम/पासूविक/ /१८
दिनांक :- २७/४/२०१८

# कार्यारंभ आदेश

प्रति,
श्री.अंबिका इन्फ्रास्ट्रक्चर
लेन नं.१०,नेहरु नगर,देवपुर,धुळे

**विषय** :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र,ताहराबाद ता. बागलाण जि.नाशिक येथे नविन कर्मचारी निवासस्थाने बांधकाम करणे

**संदर्भ** :- १)या कार्यालयाची ई निविदा सुचना क्रं.०४/२०१७-१८,दि.२७.१२.२०१७ निविदा क्रं.2017_NHM_265514_1
२)आपले कडून प्राप्त निविदा
३)या कार्यालयाचे पत्र क्रं.उपसंआसे/एनएचएम/काअ/पासूविक/२६०-२६२/१८ दि.०८/०३/२०१८
४)मा.अधिक्षक अभियंता,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.यांची मंजुर टिपणी. दि.२१.०४.२०१८

१) आपण या कामाचे आवश्यक करारपत्र पूर्ण केले आहे. उपरोक्त संदर्भ क्रं.२ नुसार आपली रक्कम रु.२,१९,९८,२९२/- ची निविदा (-१५.७७%) कमी दराने स्विकारण्यात येत आहे.

२) आपणाकडून देय असलेल्या रु.८,७९,९३२/- अनामत रक्कमेपैकी आपण रु.४,३९,९६६,/- (१% EMD + १% D.D.) एवढी रक्कम भरली असून उर्वरीत रक्कम रु.४,३९,९६६/- आपले कामाच्या देयकातून सम प्रमाणात वसूल करण्यात येईल.

३) सदर कामाचा करारनामा क्र.B-1/61/2017-18/ DH असा आहे. या पुढील पत्रव्यवहारात सदर करारनामा क्रमांक नमुद करावा.

४) काम सुरु करण्याचा दिनांक हया पत्राच्या दिनांकापासून धरणेत येईल व सदर कामाचा पूर्ण करण्याचा कालावधी बारा महिने (१२ Calender Months) राहील

५) सदर कामाचा दोष उणीवा, दायित्व कालावधी काम पूर्ण झाल्यापासुन (Defect Liability Period) ०१ वर्ष राहील.

६) कामाचे देयक अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

७) गौण खनिजापोटी रॉयल्टी भरल्याचे चलन बिलासोबत सादर करावे. अन्यथा रॉयल्टी रक्कम बिलातून वजा करण्यात येईल.

८) कामावर नियुक्त करण्यात येणा-या कामगारांचा व कंत्राटी कामाचा शासकीय विमा, संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा १ % रक्कम प्रथम देयकातून वजा करुन विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे भरणा करण्यात येईल.

९) सदरचे काम आपणास B.1 Agreement तसेच Specification मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून करणे बंधनकारक राहील.

१०) सदरचे काम आपण स्वतःच केले असल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

११) उपरोक्त काम आपण उपअभियंता, पायाभुत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद, नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली त्वरीत सुरु करावे.

१२) सदर कामाचा दर्जा व काम समाधानकारक न आढळल्यास कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

१३) सदरचे काम सुरु करणेपूर्वी व झालेनंतर विविध टप्प्यातील कामाचे फोटो सादर करण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता**
**पायाभुत सुविधा विकास कक्ष,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**नाशिक मंडळ, नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.अधिक्षक अभियंता,राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक
३) मा.जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक
४) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.नाशिक

**प्रत :- पुढील उचित कार्यवाहीस्तव.**

उपअभियंता,पायाभुत सुविधा विकास कक्ष, रा.आ.अ,जिल्हा परिषद, नाशिक